# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १९/१०/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा सोनेगाव झुल्लर गुमथळा येथे दिनांक १८/१०/२०२२ चे ११.३० वा. ते ११.४० वा. दरम्यान एमएच– ४०/ऐएम–१२२४ क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक मालक नामे– रमेश ईश्वर पारधी, वय २८ वर्ष, रा. सोनेगाव ता. कामठी जि. नागपुर याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १ ब्रास रेती कि. ४,०००/–रू. ची भरून वाहतुक करतांनी मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन एमएच– ४०/ऐएम–१२२४ क्रमांकाचा ट्रॅक्टर किमती ३,००,०००/–रू. व १ ब्रास रेती असा एकुण कि. ३,०४,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि रवि वानखेडे पो स्टे मौदा यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि द्रेवेन्द्र भूरे मो.क्र. ९५८८६७९८१४ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत मौजा बिडगाव येथे दिनांक १८/१०/२२ चे ०८.०० वा. सुमारास फुलकाबाई सगनलाल उईके (मृतक), वय ५० वर्ष (रा. मरोम बिजौरा ता. जुन्नारदेव जि. छिंदवाडा (म.प्र.) हमु बिडगाव ता. सावनेर व जखमी नामे सुनिता ईतरेस ईरपाची, वय ३५ वर्ष, रा. धादरा ताता. जुन्नारदेव जि. छिंदवाडा (म.प्र.), सौ. बबली संतलाल ईवनाती, वय ३० वर्ष व तिचा मुलगा कुमार प्रतिक संतरात ईवनाती वय ०३ वर्ष दोन्ही रा. बेरमंडल ता. जुन्नारदेव जि. छिंदवाडा (म.प्र.) हे सेन्ट्रीग काढण्याचे काम रोडच्या साईडला करीत असतांना पाठीमागुन ट्रैक्टर मुंडा क्र. एमएच– ३१/एफसी– ४९४३ चा चालक नामे– अमीत उईके ह.मु बिडगाव याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन काम करणाऱ्या मजुरांना धड़क मारल्याने १) फुलकाबाई उईके यांना जबर मार लागुन मरण पावली व ईतर २) सुनीता ईरपाची ३) सौ बबली ईवनाती ४) प्रतिक ईवनाती हे किरकोळ जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय अंबुनाल पूर्व, वय २६ वर्ष, राजाटा शेमेर ता. जुनारदेव जि. छिंदवाडा जि. छिंदवाड़ा (म.प्र.) यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि आत्राम मो.क्र. ९४०५१९४३१७ हे करीत आहे.

# पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. सावनेर –** दिनांक १७/१०/२०२२ चे १२.३० वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादीयांची १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अनिल तिवारी मो.क्र. ९६८९८९१४८६ करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**